मासिकांक २०

दिनांक: ३० डिसेंबर २०२२

# "ती"चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ.सायली अक्षय देशपांडे

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

## संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

## अतिथी संपादक: सौ. सुषमा (देशपांडे) मुलमुले

## अंक मांडणी व सजावट: अक्षय देशपांडे


पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे सर्व हक्क संबंधित पुस्तक प्रकाशकांकडे राखीव
(सर्व मुखपृष्ठे www.bookganga.com, www.amazon.com वरून साभार)

www.tichapaan.com
tichapaan@gmail.com
tichapaan
7378499977

टीप:
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.


# अंतरंग


प्रस्तावना .................................................... ४




दोन शब्द .......................................... ६

अथर्व अदमाने





नदीष्ट .............................................. ९

वर्षा पतके थोटे




किमया स्वप्नांची ............................ १४


दिशा टिकेकर




एक हिरवं अवलोकन ...................... १७


निता प्रकाश

# अंतरंग





प्रज्ञाभारतींचा प्रतिभाविष्कार ........... २२

मैथिली अंजनकर





अद्वैताचं उपनिषद ........................ २६

सई मराठे




यत्न खचून करीन मी ...................... ३०


मधुरा कुळकर्णी




कुछ इश्क़ किया कुछ काम किया ..... ३४


मानसी सगदेव - मोहरील

# अंतरंग





घास घेई पांडुरंगा ........................... ३९

संध्या दुर्गे




दीपज्योतिर्नमोऽस्तुते:एक वंदनीय प्रवास ४३

डॉ. सोनाली गायकवाड




पण”ती”ला जपतांना ...................... ४९

स्नेहा जोशी

# प्रस्तावना

*रसिकहो नमस्कार...!!!*

*ती चं पान या उपक्रमाचा २० वा मासिकांक प्रकाशित करतांना अत्यंत आनंद होतो आहे. २०२२ या वर्षातील हा शेवटचा अंक. हे वर्ष सरत असतांना वर्षाच्या शेवटी प्रत्येकाच्या मनात खूप काहीतरी साठलेलं असतं, वर्षभर वेगवेगळे अनुभव,प्रसंग आपली नजर टिपत असते आणि काहीतरी आपल्या मनात कायमचं घर करून बसलेलं असतं. या सगळ्या शृंखलेत पुस्तकं कशी अपवाद असतील नाही? आणि म्हणूनच या मासिकांकात तुम्हाला वाचायला मिळणार आहेत ती पुस्तक परीक्षणे. मुळात पुस्तक परीक्षण करण्याइतके आपण कोणीही मोठं नाही पण तरीही त्याला अवलोकन म्हणणं जास्त संयुक्तिक ठरेल असं मला वाटतं.*

*प्रत्येकाला वाचनाची गोडी अगदी लहानपणापासून लागते. अक्षर ओळख इथून सुरु झालेला प्रवास हा हळूहळू मनाला वेगवेगळ्या पुस्तकांच्या दुनियेत रमवायला लागतो आणि मग गट्टी जमते ती वेगवेगळ्या पुस्तकांशी. आजकालच्या डिजिटल तंत्रामुळे हातात घेतलेले कोरे पुस्तक, त्याचा मनाला भारावून टाकणारा सुंदर सुगंध हे फार फार दुर्मिळ झालं आहे. पण आमच्या सख्यांनी मात्र या अंकाच्या विषयासाठी पुस्तकं हातात घेऊन त्याचा अभ्यास करून नेमका त्याचा गाभा शब्दरूपाने यात मांडण्याचा सुरेख प्रयत्न केला आहे. यात ज्यांनी लिहिलं त्यांनी जणूकाही शब्दचित्रांची सुरेख रांगोळी काढली आहे की काय असेच वाटते. त्याबद्दल या सगळ्या सख्यांचे खूप खूप कौतुक आणि अभिनंदन.*

*या अंकाला दोन शब्द लिहून देणारा पुस्तकप्रेमी आणि निसर्गप्रेमी अथर्व अदमाने याचे सुद्धा खूप खूप आभार. या अंकाला सर्वांगसुंदर करणाऱ्या  श्री अक्षय देशपांडे यांच्या मी ऋणातच राहू इच्छिते. या अंकात नेमकं काय काय आहे हे अधिक मी सांगण्यापेक्षा अंक वाचून तुम्हाला जास्त आनंद होईल याचा सुद्धा मला पूर्ण विश्वास आहे. २०२२ हे वर्ष सगळ्यांचं उत्तमच गेलं तसेच नवीन वर्ष सुद्धा उत्तमच जाईल या*

*आशेसह माझ्या लेखणीला विराम देते. या अंकात उल्लेखित पुस्तकं तुम्ही नक्कीच संग्रही कराल याची खात्री आहे. पुनश्च सगळ्या ती चं पान च्या रसिक वाचकांना नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा....!!!*

*- सौ. सायली अक्षय देशपांडे*

पुस्तक : स्वामी

लेखक : रणजीत देसाई

प्रकार : कादंबरी

प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस


Amazon

BookGanga

# दोन शब्द

# ॥ स्वामी ॥

## - अथर्व अदमाने




*काही वेळा प्राजक्ताच्या फुलासारख्या येतात तुमच्या आयुष्यात अगदी थोडाच काळ. पण सुगंध मात्र आयुष्यभराचा देऊन जातात एखाद्या अत्तराच्या कुपीत साठवता न येण्याजोगा.*

*मी पहिल्यांदा स्वामी वाचलं ते सातवी आठवीत असताना. अर्थातच मराठीच्या प्रेमापोटी कादंबऱ्या वाचण्याचा सपाटा चालू होता त्या काळात. माधवराव पेशव्यांचं अल्पायुषी जीवन रणजीत*

रणजीत देसाईंच्या शब्दात वाचताना अक्षरशः त्या काळात जायला होतं. रमा माधव हे प्रेम आहेतच आधीपासून पण 'स्वामी' म्हणजे त्या प्रेमाचं शब्दबद्ध केलेलं भावनोत्कट चित्र असं म्हणेन मी.

ऐतिहासिक कादंबऱ्या या कुठलीही घटना संदर्भाच्या चष्म्यातून पाहण्यासाठीचा स्त्रोत असू नयेत. लेखकाने घेतलेलं व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य त्या घटना कदाचित एकाच कंगोऱ्यातून पाहण्यासाठी वाचकाला उद्युक्त करतं. पण 'स्वामी' मात्र तसं करत नाही. आपण स्वामी हातात घेतो तेच मुळी माधवराव पेशवे आणि रमाबाई यांच्या प्रेमकहाणीचा साक्षीदार होता यावं म्हणून. रणजित देसाईंच्या हातात असलेल्या या प्रज्ञेला शब्दांत उतरवण्याच्या सामर्थ्यामुळेही असेल, मला भावतात ते.

अवघ्या सतराव्या वर्षी अंगावर अनपेक्षितपणे पडलेली पेशवेपदाची जबाबदारी खंबीरपणे पेलून पानिपतात झालेली मराठी साम्राज्याची हानी भरून काढण्यासोबत त्याचा विस्तार करण्याकडे माधवरावांनी जातीने लक्ष घातलं. निजाम, हैदर, इंग्रज, पोर्तुगीज अशा शत्रूंना एकाच वेळेस समयसूचकता दाखवून अनेक आघाड्यांवर पराभूत करून मराठी सत्तेची विस्कटलेली घडी त्यांनी पुन्हा पूर्वपदावर आणली. राघोबादादांसोबत सुरु असलेला गृहकलह, त्यांची पेशवेपदासाठी असलेली आसक्ती आणि नानासाहेब गेल्यानंतर त्यांनी केलेली बगावत या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर देसाईंनी लिहिलेले प्रसंग निव्वळ कमाल आहेत.

अत्यंत विपरीत परिस्थिती असतानाही सगळ्या आघाड्यांवर समर्थपणे झुंजणारा हा एकमेव पेशवा असावा. अवघ्या चोविशीत जडलेला क्षयाचा आजारही त्यांनी हसत हसत स्वीकारला. आणि या सगळ्यात त्यांच्यासोबत आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या होत्या त्यांच्या धर्मपत्नी रमाबाई.

कितीही नाही म्हटलं तरी त्यांच्या प्रेमातली उत्कटता आणि थोड्या काळासाठी लाभलेला एकमेकांचा सहवास देसाईंनी इतक्या कमाल पद्धतीने टिपला आहे की आपणच तिथे त्यांचं बोलणं ऐकत उभं असल्यासारखं वाटतं अक्षरशः

'स्वामी' अनुभूती आहे. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टींची समीक्षणं करू नयेत कधीच. देसाईंच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली ही कलाकृती प्रत्येकाने एकदा अनुभवावी अशी आहेच!

काही वेळा प्राजक्ताच्या फुलासारख्या येतात तुमच्या आयुष्यात अगदी थोडाच काळ पण सुगंध मात्र आयुष्यभराचा देऊन जातात एखाद्या अत्तराच्या कुपीत साठवता न येण्याजोगा.

- मेघमंदार

- atharvaadmane06@gmail.com

पुस्तक : नदीष्ट

लेखक : मनोज बोरगावकर

प्रकार : कादंबरी


प्रकाशक: ग्रंथाली

Amazon

BookGanga

# नदीष्ट

## - वर्षा पतके थोटे




*"नदीष्ट" ही मनोज बोरगावकर यांची केवळ कादंबरी नाही, तो आहे त्यांच्या प्रत्यक्षदर्शी आणि अनुभवसिद्ध घटनांचा कसदार ललित गद्य हुंकार. नदीष्ट हातात घेतलं आणि एकाच बैठकीत वाचून काढलं. नदी एकतर माझ्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. कारण नदी माझी बालपणीची सखी. त्यामुळे नदीष्ट या कादंबरीत नेमकं काय आहे. ही उत्सुकता होतीच. पण कादंबरी*

हातात घेवून वाचायला सुरुवात केली आणि रमले या कादंबरीत. या कादंबरीचा नायक नदीवर नियमीत पोहायला जाणारा. या पोहण्याच्या प्रवासात अनेकजण जसे नायकासोबत पोहायला येण्यासाठी जोडले जातात. तसेच एक एक करून कमी सुद्धा होतात. शेवटी काही काळानंतर नदीवर नियमित पोहायला येणारा नायक एकटाच राहतो. कधीतरी एखाद-दुसरा जुना साथी येतो पोहायला. पण नियमीत नाही. नायकाला स्वतः लाही ते जाणवतं की मलाच एकट्याला नदीचे एवढे का आकर्षण आहे ? मित्रांना जरी या कादंबरीचा नायक समर्पक उत्तर देऊ शकला नसला तरी तो मनातच एक फिलोसोफी तयार करतो. त्याला वाटतं जन्माच्या आधी आपण आईच्या गर्भातच होतो ना ! आईच्या गर्भात म्हणजे एका डोहात आपण किती निर्धास्त तरंगत होतो. ना काळवेळेची शुद्ध ना चिंता ना कशाची भिती. एका तारीतच असतो आपण गर्भात. इकडून तिकडे, या किनाऱ्यावरून त्या किना-यावर , अगदी नदी सारखे.

काहीसे तळ न लागणारे, सारे आपले आपलेच वाटणारे, श्वासातून जोडलेले, चिंब चिंब भिजवणारे. नदी आणि आईचा गर्भडोह किती सारखे असतात. आपल्या असलेल्या नदीच्या अनादी आकर्षणाचे कारण आईच्या गर्भाशी तर निगडित नसेल ना ? नदी म्हणजे विस्तारत गेलेले गर्भाशय, अनेकांना सामावून घेणारे, जोजविणारे. गर्भातून बाहेर पडावे लागले की केवढी गुदमर होते आपली, पण पडावेच लागते. श्वासाला सरावाला वेळही न देता खटकन् नाळ कापली जाते. नाळ कापायला थोडा वेळ दिला असता तर श्वासाला सरावलो असतो आपण. कशाला टाहो फोडून ऊर फाटेस्तोवर रडलो असतो ?

आईशी तुटलेली नाळ नदीशी जोडल्यागत वाटत राहते मला. पोहतानाही आपण चिंब पाण्यातच

असतो, म्हणून मेंदूला पुन्हा त्या गर्भात असल्याच्या पातळीमध्ये जाण्याचा अनुभव येत असावा. यामुळेच मन आणि शरीर सुखावत असावे. किती सुरक्षित असतो नाही आईच्या गर्भात! पाण्यात नुसते डुंबत असतो. एक सुकून सोबतीला घेऊन. नदीवर येण्याचे, मनसोक्त डुंबण्याचे आपले कारण हे असावे आपल्यापुरते असं नायकाला वाटत राहतं म्हणून तो नियमीत नदीवर पोहण्यासाठी येत राहतो.

या प्रवासात त्याला बरेच वेगवेगळे लोक भेटत जातात. जसे की, सकिनाबी भिकारीण. जी अत्यंत कुरूप या सदरात मोडणारी असून तिचा दिवस आणि रात्र स्टेशनवर भीक मागून खाण्यात जात असते. नायक रोज तिच्याशी जाता येता बोलत असतो. पण कित्येक महिने सकिनाबी दिसली नाही म्हणून हळवा सुद्धा होतो. तिचा शोधही घेतो. पण ती बेवारस मेली ऐकल्यावर आतून हळवा ही होतोय. तिचं 'माटीमिले' हे ऐकण्यासाठी आतूरही होतो. किती संवेदनशीलपण घेऊन नायक वावरत असतो. मासे पकडायला येणारा बामनवाड यांच्या बाबतही त्याला सहानुभूती वाटत राहते.

मंदिराच्या अंगणातील झाडलोट करणारा इरबा याचं जग सुद्धा नायकाला संभाषणातून जाणून घ्यायचं असतं. पण वाचताना जाणवतं ते हे की, नदीष्ट या कादंबरीत नदी आणि तिच्याशी समांतर पणे वाहत जाणारं जीवन हे सगुणाचं आहे. सगुणा नायकाला नदीवरच्या पोहण्याच्या प्रवासात भेटलेली एक तृतीयपंथी. जिला जग हिजडा, छक्का म्हणतं. नायकाला वरकरणी समाजाच्या दृष्टीने तिरस्कृत, बीभत्स असलेल्या हिजड्यात एक अविश्वसनीय शहाणपण दडलेले असल्याचे जाणवते. मध्येच हिंदी, मध्येच मराठी अशी सरमिसळ भाषा बोलणा-या सगुणात नायकाला थोडा इंटरेस्ट वाटू लागतो आणि ती आपलं विश्व नायकासमोर कसलीही भिस्त न

किती अजब आहे सगळंच. दोन टोकाची दोन माणसं. तिच्यासाठी मन मोकळे करणे म्हणजे खोलवर रूतून बसलेली उम्रभरची भडास अन् नायकांसाठी मात्र एक प्रकारचा टाईमपास. सगुणा तिच्या आयुष्याचा पडदा नायकासमोर सहज उलगडत जाते त्यामुळे नायकाची भीड पूर्णपणे चेपली गेलीय असं तो म्हणतो. या भिडस्तपणामुळे नायकाला सगुणाचे 'हिजडा' हे विश्व समजून घेता आलं... आणि सोबतच वाचकांनाही. आपण किती सुरक्षित आयुष्य जगतोय हे आवर्जून मनात येतं जेव्हा सगुणा तिचं विश्व कादंबरीच्या नायकासमोर उलगडत असते.

गेली दहा वर्षे नायक नियमीतपणे नदीवर पोहायला येतो. कितीतरी लोक भेटतात, त्यांच्याशी एक जवळीक निर्माण होते. काही काळाने ती लोकं सुद्धा भेटीनाशी होतात, निघून जातात. तरीही नायक मात्र नियमीत नदीवर येत राहतो. कारण त्याला वाटतं नदी ही लाखमोलाची आहे. तिचे असणे त्यांच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. माणसांच्या, निसर्गाच्या युगानुयुगापासूनच्या असण्यातून नदीच काढून टाकली...तर बाकी काय उरेल ? तिचे असणे तिच्या प्रवाहापुरते मर्यादित नाही, तर तिथल्या सभोवतालातील सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक जगण्याचा ती अविभाज्य भाग असते.

नायक नदीच्या त्या सुनसान किना-यावर एका तृतीयपंथी बरोबर तासनतास बसत होता. तिचं विश्व जाणत होता, ऐकत होता...ही काही छोटीशी गोष्ट नव्हे. हे दोन विश्वाचं आदान- प्रदान होतं. नदीच्या किना-या किना-यानेच वस्ती आणि संस्कृती वसत गेली आहे. असे कितीतरी अनगिनत कण नदीने उदरात सामावून ठेवलेले असतात. नदीच्या साक्षीने किती कहाण्या, किती माणसे, किती रिवाज, किती माणूसपण आणि अमानुषपणे देखील घडत बिघडत गेले

गोष्टी लुप्तही झाल्या असतील.

नायक म्हणतो आपण नदीच्या जितके जवळ जाऊ तितके ती आपल्याला 'लिव्हींग ऑरगॅनिझम' वाटत राहते. आपण नादिष्ट नाही तर नदीष्ट आहोत. भिकाजी आणि सगुणा दोघंही या नदीच्या पोहण्याच्या प्रवासात नायकाला भेटलेले पांथस्थ. पण तरीही ती दोघे निघून गेल्यावर नायकाला त्याचं एकटेपण नदीच्या किना-यावरून त्याच्या अंगावर चाल करून येतंय असं वाटतंय. नदीवर आलं की आधी त्यांचीच आठवण त्याला येते. त्या दोघानंतर एक नवीन फकीर दिसतो पण मन मात्र त्या दोघांमध्ये अडकलं असतं. काही कोस अंतर पार केल्यावर नदीचे पाणी आपोआप जसे शुद्ध होऊन जाते. असेच काही अंतर चालून गेल्यावर माणसालाही शुद्ध होता आलं असतं. तर नदीसारखं प्रवाही माणसालाही होता आलं असतं. नदी ही कादंबरीच्या नायकासाठी जितीजागती होती, आहे. तिचे जिवंतपण त्यांच्या असण्याशी निगडीत आहे म्हणून त्याला ती " लिव्हींग ऑरगॅनिझम" वाटते. त्यामुळेच नदीच्या परिसरात भेटलेल्या सजीव- निर्जीव प्रत्येकाने या कादंबरीच्या नायकाला नदीप्रमाणे समृद्ध केले आहे.

अतिशय उत्कृष्ट अशी ही कादंबरी आहे. आपण सगळे लिव्हिंग ऑरगॅनिझम आहोत. हे जरी खरं असलं तरी नदीष्ट ही कादंबरी आपल्याला ख-या अर्थाने लिव्हींग ऑरगॅनिझम वाटत राहते. हे तेवढेच खरे!

- vpatke2606@gmail.com

पुस्तक : द अल्केमिस्ट

लेखक : पाओलो कोएलो

प्रकार : कथा, तत्वज्ञान

प्रकाशक : मंजुल पब्लिशिंग हाउस

Amazon

BookGanga

# किमया स्वप्नांची

- दिशा टिकेकर




*गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मध्ये उच्चांक गाठणारी एक रसाळ कादंबरी म्हणजे 'द अल्केमिस्ट' अल्केमिस्ट या शब्दाचा अर्थ होतो किमयागार. ही किमया आहे अशक्य असलेल्या स्वप्नाच्या पूर्ततेची. स्वप्न साकार करणारी अद्भूत कथा पाउलो कोएलो यांच्या लेखणीतून उतरली आहे. आपल्या आंतरीक आवाजाची जाणीव करून देणारी ही कथा आहे. या पुस्तकाचे मराठी*

अनुवाद नितीन कोत्तापल्ले यांनी केला आहे. या पुस्तकात स्वप्नांचा पाठलाग करतांना मिळालेली प्रेरणा, अनोख्या प्रदेशाच्या दिशेने सुरु असलेला प्रवास, सर्व काही गमावल्यानंतरही जग जिंकण्याची उर्मी असे एक ना अनेक प्रसंग वाचकाला कथेशी जोडून ठेवतात.

‘कोणत्याही खजिन्याचा शोध बाहेर कशाला घ्यायचा तो आपल्याच अंतर्मनात असतो’, असा संदेश देणारे हे कथानक आहे. शकुनाचे आणि प्रतीकाचे भान ठेवून स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील कसे राहावे याचे मार्गदर्शन करणारी ही कादंबरी.

‘द अल्केमिस्ट’ ही सॅन्तियागो नावाच्या मेंढपाळाची गोष्ट. मेंढ्यांची देखभाल करणे हेच त्याचे दिवसभराचे काम. सॅन्तियागो याला सतत एक विचित्र स्वप्न पडत असे. त्या स्वप्नाचा अर्थ जाणून घेण्यासाठी तो शेजारच्या गावातील एका ज्योतिष बाईला स्वप्नाचा अर्थ विचारतो. ती बाई सॅन्तियागोला सांगते की, ‘इजिप्तमध्ये पिरॅमिडपाशी त्याला खजिना मिळणार आहे.’ तो खजिना शोधण्यासाठी सॅन्तियागो इजिप्तच्या प्रवासाला निघतो.

प्रवासात सॅन्तियागोला अनेक लोक भेटतात. प्रत्येकाच्या सल्ल्यानुसार तो वागतो. कधी ते खरं होत तर कधी तो फसतो. एकदा तर तो प्रवासात स्वतःची मेंढरं विकून पैसे एका सहप्रवाशाकडे ठेवायला देतो तो सहप्रवासी त्याला फसवून निघून जातो. सॅन्तियागो नंतर एका व्यापाराकडे कामाला लागतो. तिथे पैसे जमवतो आणि निघून जातो. पुढे तो एका इंग्रज माणसाला भेटतो. त्याच्या सोबत तो मरुवनात जातो. इथे सॅन्तियागो याची लवस्टोरी सुरु होते. तिथे तो एका फातिमा नावाच्या अरबी मुलीला भेटतो. तिच्या प्रेमात पडतो आणि तिला लग्नासाठी विचारतो. ‘तुझा प्रवास संपल्यावरच मी तुझ्याशी

लग्न करेन.' असे फातिमा त्याला म्हणते. तिला तिच्या प्रेमावर विश्वास असतो. सॅन्तियागो फातिमाला लग्नाचे वचन देऊन पुढच्या प्रवासाला निघतो. पुढे असेच काही संकटांचे सामने करत तो शेवटी पिरॅमिड पर्यंत पोहचतो. त्याच्या स्वप्नात दिसणारे पिरॅमिड त्याला दिसू लागतात. तो आता तिथे खजिना मिळविण्यासाठी खोदकाम करायला सुरुवात करतो. त्याला वाटते आता आपल्याला खजिना हा मिळणारच. त्याला खजिना मिळतो पण तो खजिना कोणता असतो हे बघण्यासाठी पुढे वाचकांनीच हे पुस्तक वाचावे.

'द अल्केमिस्ट' ही कथा आपणांस आपल्या आंतरिक आवाजाची जाणीव करून देते. प्रतिके आणि शकुन लक्षात घेऊन स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नशील कसे राहावे याचे मार्गदर्शन करणारी ही रंजक अशी बोधपूर्ण कथा आहे.

- tikekardisha@gmail.com

पुस्तक : जंगलाचं देणं

लेखक : मारुती चितमपल्ली


प्रकार : माहितीपर

प्रकाशक : साहित्य प्रसार केंद्र

Amazon Bookganga

# एक हिरवं अवलोकन

**- निता प्रकाश**




हिरव्या रानातला हिरवा सुगंध
भरून उरला काननी सबंध
*हिरव्या वाटा, हिरवी वृक्षराजी,*
*खळखळ झरे, विस्तीर्ण जलाशय,*
*पाण्यात पडलेल्या हिरव्या निळ्या*
*पर्वतमालांच्या छाया, संधी प्रकाशात*
*मोह पाडतात, या हिरव्यागार*
*पसाऱ्यावर दृष्टी ठरत नाही. अशा*
*हिरव्या अरण्यातून मी चालत असता*
*कुठेतरी खुट्ट झालं आणि मला जाग*

बघते तर मी आपल्या गादीवर होते, अच्छा हे स्वप्न होतं तर, पुस्तक वाचता वाचता माझा कधी डोळा लागला ते कळलंच नाही आणि  हिरवंगार समृद्ध अरण्य स्वप्नात आलं. ही लेखक मारुती चितमपल्ली सरांच्या पुस्तकांची किमया, अगदीच न्यारी. वाचता वाचता प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जगायला लावणारी.

लेखक मारुती चितमपल्ली सरांचं,जंगलाच देणं नावाचं पुस्तक वाचत असता, डोळ्यांसमोर तरळून जातात ती हिरवीगार जंगलं, वनं, पक्षी, प्राणी, गुहा,सरांच्या लेखनातून आपल्याला हे सगळं भेटत असतं, वाटतं आपण पण जंगलाची सैर करित आहोत.

सरांच्या साहित्यात पक्षी, प्राणी, जंगल, जंगलात राहणाऱ्या लोकांची दिनचर्या आपल्याला वाचायला मिळते. पक्षी जाय दिगंतरा, जंगलाचं देणं,रान वाटा, रातवा, पाखर माया, निसर्ग वाचन, सुवर्ण गरुड, आपल्या भारतातील साप, आनंददायी बगळे, निळावंती, पक्षी कोश, चैत्र पालवी, केशराचा पाऊस, चकवा चांदणं, चित्रग्रिव, जंगलाची दुनिया ही त्यांच्या सगळ्या पुस्तकांची नावे येथे मुद्दाम देते आहे निसर्गप्रेमी वाचकांना सोयीचे जावे म्हणून. आणि जे निसर्ग सौंदर्य प्रेमी नाहीत ते सुद्धा ह्या पुस्तकातील वनांच्या प्रेमात पडल्याशिवाय राहणार नाहीत.

मी लहानपणापासून जंगलात वाढलेली त्यामुळे निसर्गप्रेमी. जंगलाबद्दलचे आकर्षण, प्रेम जास्त आहे. निसर्गात रमायला आवडतं चितमपल्ली सरांच्या लेखनातून जंगल वेगवेगळ्या रूपात आपल्याला भेटत असतं. सरांची वर सांगितलेली सर्वच पुस्तकं मी वाचून काढली आहेत. त्यांच्या साहित्यातून वनं, अरण्यं आपल्याला कळतात.

चिरपल्लवी वृक्षांच्या जंगलासारखं अत्यंत स्वास्थ्यकारक आणि सुंदर स्थळ जगात कुठे नसावं स्फटिकवत पाणी निर्झरांतून वाहत असते, हवा शुद्ध असते. अशा वनात भटकायची फिरायची एक वेगळीच मजा असते. जंगलातील वाटेने एखाद्या वृक्ष समूहाकडे पहात आजूबाजूचे आवाज ऐकत जावे. सर्व वयांची झाडे तिथे उभी असतात अगदी एखाद्या वाढ थांबलेल्या वृक्षापासून ते बालतरुपर्यंत नजरेत भरेल अशा दहा पंधरा वृक्षांच्या सजातीय समूहाकडे बघायचं त्यात एखादा प्रचंड वृक्ष आभाळात सरळ मान करून उभा असतो तर काही वाकलेले वृक्ष ही वाढलेले असतात. त्याच प्रमाणे शेलाटी झाडं ही उभी असतात. उंच वृक्षांनी त्यावर सावली धरल्यामुळे जणू त्यांचं वाढणं खुंटलेलं असतं काही झाडे जमिनीला कोन करून वाढत असतात, कुठे दोन झाडे एकमेकांना आलिंगन देत वाढत असतात तर एखादं झाड दुसऱ्या झाडासमोर नम्र व्हावं तसं ओणावलेलं असतं, जंगलातील वाटेने जाताना या वृक्ष समुदायाकडे पाहताना वाटतं की या वृक्षांचं एकमेकांशी नातं आहे या कुटुंबातील नातं शोधणं, पाहणं हा एक विरळाच छंद आहे. प्रत्येक वृक्षाच्या छताचा आकार वेगळा, काष्ठ शिल्पे वेगळी, एक दुसऱ्या सारखी नाही. त्यातून चांदण्यांनी भरलेलं आभाळ पहावं, ग्रहताऱ्यांची लक्ष लक्ष पानं हलू लागतात. जंगलात कधी पाऊस पडेल हे सांगता येत नाही. जंगलातील वाटेने चालताना अचानक पावसाची साद ऐकू येते, ती साद जवळजवळ येऊ लागते तेव्हा आपण कुठेतरी आसऱ्याला जावं म्हणून झाड शोधत असतो, नंतर लक्षात येतं तो पाऊस नसतोच सागाच्या जंगलातील झाडाझाडातून वाहणारा तो वारा असतो.

ऋतुगंध घेऊन येणारा पहिला पाऊस, त्या पहिल्या पावसाचा गंध श्वासा श्वासात भिनत जातो. त्या पावसाचा नादलुब्ध आवाज अप्रतिम

*असतो,हळूहळू येणारा हळूहळू येत वाढणारा, वाढत वाढत दूरपर्यंत कमी कमी होणारा, असे अद्भुत आवाज फक्त अरण्यात ऐकू येतात.*

*जंगल ही निसर्ग, पृथ्वी आणि मनुष्य जीवन यांचा ताळमेळ ठेवणारी एक परिसंस्था आहे वन्यजीव आणि मानव जातीला जंगलाचा फायदा होतो म्हणून त्यांचे खूप महत्त्व आहे वसुंधरेचे खरे सौंदर्य म्हणजे जंगल, वसुंधरेचा हिरवागार शालू म्हणजे हिरवळ जी फक्त जंगलांमुळे असते. विविध प्राणी, पक्षी, फळे व औषधी, इंधन,चारा, लाकूड हे सगळं सगळं मनुष्यासाठी दैनंदिन जीवनातील जीवनासाठी आवश्यक आहे. जंगलं जपण्याची फार गरज झालेली आहे कारण जंगलं नष्ट होत आहेत जनसामान्यांपर्यंत जंगलाचे महत्त्व पोहोचावे म्हणून असा लेखन प्रपंच प्रत्येक लेखकाने वारंवार करावा.*

**जंगलाचं देणं**

**हिरव्या वनातलं**

**हिरवं गाणं**

**जंगलाचं देणं**

**जीवन समृद्ध होऊन जाणं**

पुस्तक : श्रीविवेकानन्दविजयम्


लेखक : श्रीधर भास्कर वर्णेकर

प्रकार : नाटक

प्रकाशक :

# प्रज्ञाभारतींचा प्रतिभाविष्कार

## - मैथिली अंजनकर




*भारतीय नाट्यसृष्टीला फ़ार प्राचीन अशी प्रदीर्घ उज्वल परंपरा आहे . भारतीय नाट्यसृष्टीला संस्कृतने दिलेले मौलिक योगदान अभूतपूर्व स्वरुपाचेच आहे. मानवी जीवन आणि सांस्कृतिक पर्यावरण यांचे सुंदर दर्शन संस्कृत नाटककारांनी आपल्या साहित्य विधांमधून प्रकर्षाने घडविले आहे .*

*प्रज्ञाभारतीकरांचे " विवेकानन्दविजयम् "हे असेच एक संस्कृत साहित्य*

सृष्टीच्या मुकुटावरील नितांत सुंदर मोरपिसच  होय.

संस्कृत ही सर्वात प्राचीन  भाषा आहे. अगदी श्रुती पासून सुरु झालेल्या परंपरा जपणारी आणि सर्व भाषा जननी असणाऱ्या संस्कृत मध्ये आधुनिक काळात नवनवीन साहित्याची निर्मिती झालेली दृष्टीस पडते. आधुनिक संस्कृत साहित्यातही बऱ्याच प्रकारचे लेखन दिसून येते .

आधुनिक संस्कृत साहित्यात वेगवेगळे विषय हाताळले गेले आहेत. यात बालसाहित्य , तत्कालिन राजकीय परिस्थितीवर भाष्य  स्त्रीभ्रूणहत्येसारख्या ज्वलंत विषयावर  लिखाण दिसून येते. यासोबतच  तत्कालिन सामाजिक स्थिती , पर्यावरण, हास्यव्यङ्ग, मोबाईलचा अती वापर हे विषय देखील आढळुन येतात .

आधुनिक संस्कृत साहित्यामध्ये सर्वश्री पंडित अंबिका दत्त व्यास, प्रो.श्रीनिवास रथ, प्रो. रेवाप्रसाद द्विवेदि इत्यादीं सारख्या दिग्गज साहित्यिकांचा नामोल्लेख गौरवाने करावा लागतो यांनी आधुनिक संस्कृत आहे त्या विषयाला एक नवा चेहरा दिला .

आधुनिक संस्कृत आहेत त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे श्रीधर भास्कर वर्णेकर होय. डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर एक संस्कृत महाकवी होते. नागपूरचे भूषण म्हणजे डॉक्टर श्रीधर भास्कर वर्णेकर होय . बालपणापासूनच त्यांना वाचनाची प्रचंड होती . साहित्यातील विविध प्रकार वर्णेकरांनी आपल्या लेखणीने सिद्ध केले त्यातीलच नाटक हा एक प्रकार होय.

“ विवेकानन्दविजयम् ”  हे महानाटक श्रीधर भास्कर  वर्णेकरांनी लिहिलेले आहे. हे दहा अंकी नाटक असून महानाटक या प्रकारात हे नाटक गणल्या जातं.

महानाटकाची परंपरा संस्कृत साहित्यामध्ये पूर्वीपासून दिसून येते . संस्कृत साहित्यामध्ये महानाटकाची

बालरामायणापासून आपल्याला दिसून येते . नंतर् हनुमान्नाटक अथवा महानाटक हे नाटक श्री हनुमंत यांनी लिहिलेले आहे . " भास्करोदय " महानाटक यतीन्द्र चौधरी यांनी लिहिलेलं आहे . याशिवाय रामशास्त्री यांनी लिहिलेले " नलविजय " हे नाटक देखील महानाटक आहे .याप्रमाणे संस्कृत साहित्यात काही महानाटकं आहेत याशिवाय अजुन काही असतील.

दशारूपकामध्ये महानाटकाचे लक्षण सांगितलेले नाही .परंतु नाट्यवाङ्मयमध्ये हनुमंत कवीने लिहिलेल्या चतुर्दशां , हनुमन्ननाटक तसेच राजशेखने लिहिलेल्या दशाकं बालरामायणामध्ये महानानाटकाचे लक्षण दिसून येते. " विवेकानन्दविजयम् हे नाटक नाटक लक्षणानी आणि युक्त तर आहेच पण महानाटक लक्षणानी देखील युक्त आहे.

विवेकानन्दविजयम् नाटकाला महानाटक का म्हणायचे ? तर हे नाटक हे विवेकानंद या महापुरुषावर आहे म्हणून त्याला महानाटक म्हणायचे. हे चरित्रात्मक नाटक आहे लेखकांनी याला महानाटक म्हटले आहे कारण यामध्ये दहा अंक आहेत आणि या नाटकाचा नायक विवेकानंदासारखे महापुरुष आहे .

" विवेकानन्दविजयम् " या नाटकामध्ये बालक नरेंद्र पासून ते स्वामी विवेकानंदापर्यंतचा प्रवास वर्णित केला आहे. प्रस्तुत नाटकांमध्ये दहा अंक आहेत प्रत्येक अंकाला प्रसंगानुरूप नाव आहे .

प्रस्तुत नाटकामध्ये तत्कालिन समाजाचे चित्रण दिसून येते . बालविधवांचे दुःख, युवकांचे प्रतिनिधित्व करणारे वामाचरण, रहमान हे युवक, स्वामी विवेकानंदाचा बाल्यकाळ , अपृश्यांना दिली जाणारी वागणुक , रामकृष्ण परमहंसाशी विवेकानंदांची

झालेली भेट , रामकृष्णांनी पाण्याच्या द्वारे ईश्वराविषयी सांगितलेला सिद्धांत आपल्या लक्षात राहतो, विवेकानंदानी धर्म परिषदेसाठी शिकागोला जायला घेतलेले कष्ट , स्वामींचे शिकागोचे भाषण इ . गोष्टी हे नाटक वाचताना आपल्याला खिळवून ठेवतात .

प्रज्ञाभारतींचा प्रतिभा आविष्कार या नाटकाच्या निमित्ताने रसिक सुजाण, सुसंस्कृत ,अभिजात वृत्तींच्या व्यक्तींनी अत्यंत सहृदयतेने अनुभवला आहे .भारतीय संस्कृतीचा मूलकंद उकलून दाखविणाऱ्या विवेकानंदांचे चरित्रचित्र अत्यंत कलात्मकतेने पण तेवढयाच विवेकानिष्ठेने प्रज्ञाभारतींनी प्रस्तुत दशांकी नाटकाद्वारे केलेले आहे . विवेकानंदांच्या व्यक्तिमत्वातील वादळाचा ताल आणि तोल त्यांनी आपल्या प्रातिभिक शक्तीबलावर लीलया तोलून धरलेला आहे .

लेखकाची शैली, उत्कंठा वाढविणारे कथानक यामुळे हे नाटक वाचनीय आहे . म्हणून सर्वांना आवडणारे हे नाटक आहे.

- maithileeanjankar@gmail.com

पुस्तक : अद्वैताचं उपनिषद

लेखक : शुभांगी भडभडे


प्रकार : धार्मिक

प्रकाशक : विजय प्रकाशन

Bookganga

# अद्वैताचं उपनिषद

## - सई मराठे




*"अद्वैताचं उपनिषद -आद्य शंकराचार्यांची जीवनगाथा", हे पुस्तक वरकरणी जरी जड, भारदस्त अशा शब्दांनी भरलेलं वाटलं तरी एकदा वाचायला सुरुवात केल्यानंतर कोणताही वाचक ते पुस्तक पूर्ण केल्यानंतरच सोडेल इतकी पुस्तकाविषयीची ओढ त्या वाचकाच्या मनात निर्माण होते. त्याच्या शेवटच्या पानापर्यंत त्याला खिळवून ठेवण्याचे*

सामर्थ्य त्या लेखिकेच्या लेखणीत आणि त्या पुस्तकामधल्या नायकाच्या चरित्रात आहे.

आठ वर्षांचं आयुष्य घेऊन जन्माला आलेले , एकपाठी, संयमित वृत्ती, स्थितप्रज्ञ, प्रज्ञेची पौर्णिमा ज्यांना म्हणतात असे, जगद्गुरु आद्य श्री शंकराचार्य यांचे हे जीवन चरित्र आहे. ज्यांनी प्रत्येक स्त्रीला केवळ माता स्वरूप पाहिलं, एखादी योगी, तपस्विनी हिला ज्यांनी नेहमीच प्रति सरस्वती म्हणून पाहिलं, पूजलं, ते आचार्य शंकर.

आपल्या कालटी गावात आलेला पूर, आईला आणि सगळ्यांनाच होणारा त्रास बघून ,स्थिती ओळखून नदीला प्रवाह आवरण्यासाठी निसर्ग प्रकोपाला शांत करण्यासाठी सतत तेरा दिवस अन्नजल ग्रहण केल्याविना ध्यान लावून विनवणी करणारे आणि पूर्ण नदीचा प्रवाह आपल्या अनन्य भक्तीने बदलवून टाकणारे, वयाच्या केवळ आठव्या वर्षी "आचार्य" झालेले श्री शंकराचार्य.

असा व्यक्ती शिष्य म्हणून लाभणं याच्यासारखा आपला दुसरा सन्मान नाही असं ज्यांच्याबद्दल वाटावं असं ते व्यक्तिमत्व. ज्यांना आचार्य गोविंदपाद यांनी त्यांच्या आयुष्यातली आठ वर्षे दिली आणि त्यांचे आचार्य गौडपाद यांनी त्यांच्या आयुष्यातली 16 वर्ष दिली व सांगितलं की "जो वर कार्य आहे तोवरच जीवन" अशा अनिश्चित ,असत्य परंतु वास्तवामध्ये  असं दानामध्ये मिळालेलं वाढीव आयुष्य जगणारे आणि केवळ 32 वर्षांच्या सीमित जीवनाच्या कालावधी नंतर समाधानाने अनंत यात्रेला सुरुवात करणारे ,जगतगुरु उपाधीने सन्मानित आदि शंकराचार्य यांचं हे चरित्र.

या पुस्तकात सिद्ध हस्त लेखिका शुभांगी भडभडे यांनी आपल्यासमोर फक्त द्वैत आणि अद्वैत सिद्धांत, कर्मकांड, मूर्ती पूजा ,अद्वैत निराकार रूप, वेद ,उपनिषद, असं केवळ या आध्यात्मिक विषयांवर भाष्य न करता आचार्यांचं समाजजीवन, राष्ट्रहित

धर्मजागरण, धर्म संघटन ,व्यक्ती स्वभाव , यांचे त्यांना आलेले अनुभव या अश्या अनेक बाजू सांभाळून लेखिकेने चरित्रात्मक कादंबरीची सुंदर मांडणी केलेली आहे.

जरी ते कठोर ब्रह्मचारी होते, संन्यासी होते तरी त्यांचे भावनाशील मन ,त्याच्यात उठणारे विचारांचे आवर्त आणि एक संन्यासी असूनही आपल्या आईच्या मृतदेहावर अंतिम संस्कार करण्याचा त्यांचा धाडसी निर्णय, ही व अश्या अनेक घटना आहे ज्यात आचार्यांच्या भावनिक मनाची उकल लेखिकेने सुयोग्य शब्दात तत्त्वांच्या आधारावर करून दिलेली आहे. त्यामुळे हे पुस्तक आध्यात्मिकते कडे जरी झुकलं असलं तरी विज्ञानाच्या कसोटीवर खरं उतरलेलं आहे.

आचार्यांचं निसर्गप्रेम नर्मदा नदी ,यमुना नदी ,पंढरपूर, काशी, हिमालय, द्वारका, जगन्नाथ पुरी, अशा एक ना अनेक तीर्थक्षेत्रांच वर्णन व त्यासोबतच त्या त्या ठिकाणी आचार्यांनी केलेल्या श्लोकांचा उल्लेख ती स्तवनं ,त्यांचा संक्षिप्त रूपात उल्लेख लेखिकेने केला आहे.

आचार्यांच्या या दिग्विजय यात्रेमध्ये त्यांच्यावर आलेले अरिष्ट, त्यांच्यासोबत अन्यायाने वागणारे, त्यांच्या सिद्धांतांशी सहमत नसणारे, नाना प्रकारे विरोध करणारे असे कितीतरी प्रसंग आले त्या सगळ्यांना तोंड देत निराकार स्वरूपाला मान्यता देण्यासाठी ,अद्वैत सिद्धांताला सिद्ध करण्यासाठी शैव ,वैष्णव, गाणपत्य, शाक्त, कापालिक हे सगळे संप्रदाय एकच आहेत हे समजवून देण्यासाठी, आचार्यांना झालेले अपरिमित कष्ट याची जाणीव आपल्याला हे पुस्तक वाचून लेखिका करून देते.

लेखिकेने "माझी भूमिका" या मथळ्या अंतर्गत योग्य शब्दात लिहिलयं-

"आचार्य शंकर हे कोणाचे अवतार मानलं तर त्यांची प्रयत्नांची पराकाष्ठा, अविश्रांत यात्रा ,अतुलनीय धर्म संघटन

आणि राष्ट्रनिष्ठा यावर अवताराचं वर्चस्व येऊन मनुष्याची पराकोटीला जाण्याची क्षमता त्यात लपून जाते. त्यांना सिद्धसाधक ,युगनेता ,धर्मपुरुष युगद्रष्टा किंवा राष्ट्रधर्माच्या महावाक्याचा जनक म्हणता येईल."

राजा अमरुकच्या देहात प्रवेशाची कथा म्हणजे परकाया प्रवेशाचा प्रसंग लेखिकेने वर्णन केला आहे. मंडनमिश्र त्यांची पत्नी सरस्वती यांच्यासोबत झालेला शास्त्रार्थ जेव्हा आपण वाचतो तेव्हा आपण लेखिकेचे ऋण मानायला हवे की त्यांनी वाचकांमध्ये सनातन धर्म ,संस्कृती, शाश्वत मूल्य, आचार-विचार यांच्या सीमा , देह, आत्मा ,स्वर्ग -नरक, द्वैत -अद्वैत याच्या संकल्पना या सगळ्यांचं अभ्यासपूर्ण विवेचन अतिशय साध्या व सोप्या भाषेत आपल्यापर्यंत पोहोचतं केलेलं आहे.

शारदापीठाचे दक्षिण द्वार सर्वांसाठी मोकळे करून ज्ञानाची कवाडं उघडी करून देणारे, मुक्तहस्ताने ज्ञानदान करणारे ,चारी दिशांना चार मठांची स्थापना करून भारताला एका धर्मसूत्रात बांधणारे जगद्गुरु श्री शंकराचार्य यांच्या चरित्राचं शिवधनुष्य यशस्वीरित्या पेलणाऱ्या लेखिका शुभांगी भडभडे यांच्या अभ्यासू वृत्तीचा कळसाध्याय ज्याला म्हणावा अशी ही कादंबरी आपल्या धर्म आणि संस्कृतीवर प्रेम असणाऱ्या प्रत्येकानी वाचावी अशीच आहे आणि हीच विनंती.

- sanjeeva-

nee02marathe@gmail.com

पुस्तक : बोक्या सातबंडे

लेखक : दिलीप प्रभावळकर


प्रकार : बाल साहित्य

प्रकाशक : राजहंस प्रकाशन

Bookganga Amazon

# यत्न खचून करीन मी

- मधुरा कुळकर्णी




*बोक्या सातबंडे हे खरं तर दिलीप प्रभावळकर लिखित माझं आवडतं पुस्तक. त्याच्यात नवव्या भागात असलेली ही कथा विनोदी नाही वाटली.*

*ते करपलेलं मन आणि निष्फळ ठरलेले प्रयत्न डोळ्यात पाणी आणल्याशिवाय राहत नाहीत... शेवटी एक कळते ते म्हणजे कोणामध्ये पडायचे नाही हेच शेवटी वैश्विक सत्य*

होऊन बसते...

बोक्या अवखळ, गोंडस गोजिरवाणा आणि सगळ्यांना मदत करणारा...

त्याच्या प्रकल्पामुळे त्याला शाळेत जास्त वेळ थांबावे लागणार असते आणि त्याच्यासोबत त्याचे दोन मित्र असतात. त्याचे वराडकर सर येईपर्यंत तो फेरफटका मारत असताना त्याला त्याचे दुसरे सर त्याला एक पुडके आणण्यासाठी एका खोलीची चावी देतात आणि ती खोली शोधत असताना एक मुलगी मुसमुसत रडत आहे असं त्याला दिसतं. तिथे एखाद्या प्रेम प्रकरण आहे किंवा गुंडांनी छळलं असे अनेक प्रश्न त्याला पडतात. शाळा सुटली वेळ झाला तरी ही मुलगी का गेली नाही ? असा प्रश्न त्याला पडतो. विचारपूस करता करता त्याला तिचे नाव अपूर्वा असे आहे कळतं आणि तिचे आई वडील घटस्फोट घेणार आहेत असं ती सांगते. तो तिला घरी जायला सांगतो...

हताशपणे ती घरी जाते...

इकडे बोक्या मात्र उदास होतो..

दुसऱ्या दिवशी तो शाळेत गेल्यावर ती मुलगी स्वतहून त्याला भेटायला येते आणि सांगते की काल जे तुला सांगितलं ते गुपित ठेव. सध्या तिचे पप्पा घरी राहत नाहीत आत्याकडे असतात आणि तिला छोटी अर्पिता नावाची बहीण आहे असं ती सांगते...

बोक्याच्या प्रकल्पाच्या प्रदर्शनात ती एक धान्याची रांगोळी काढणार आहे असं ती सांगते. बोक्या त्याच्या वर्गातल्या मुलींशी सुद्धा बोलत नसतो तर या नववी मधल्या मुलीशी काय बोलत आहे असा प्रश्न वर्गातल्या मित्रांना पडतो..

दुसऱ्या दिवशी बोक्या तिला शोधायला लागतो पण मनात शंकांचे काहूर उठते की तिला काही झाले तर नसेल ना!

अपूर्वा त्याला भेटते आणि काल तिच्या आई-वडिलांचा पुन्हा भांडण झालं असं त्याला कळतं...

आणि मग बोक्याच्या डोक्यात तिच्या

आई-वडिलांना एकत्र आणायचं येतं...

आई-वडिलांना काही सांगत बसत नाही कारण "कशाला नसते उद्योग!" असेच ते म्हणतील असं त्याला वाटतं.

बोक्या अपूर्वा कडून तिचे वडील ज्या लायब्ररीत जायचे त्या लायब्ररीचा पत्ता घेतो आणि तिच्या वडिलांनी देणगी दिलेली पुस्तके मागतो...आणि त्याच्यात तिच्या आई वडिलांचे दोन फोटो लपवून तिच्या आत्याच्या घरी देऊन येतो.

अपूर्वा चे बाबा त्याला भेटतात तिथे...

तिकडचा पत्ता कोणी दिल्यावर बोक्या तुमच्या मुलीने दिला असं सांगतो...

हे सर्व प्रयत्न त्याच्या आई-वडिलांना एकत्र आणण्यासाठी चाललेले असतात अपूर्वाच्या.

बोक्या आता त्याच्या दोन मित्रांना या कामासाठी लावतो... अपूर्वा कडून आई च्या घरातला

अपूर्वा च्या आईने तिच्या बाबांसाठी घेतलेला चांदीचा पेला अपूर्वा कडून मागून घेऊन त्याचा मित्र पत्ता शोधत शोधत जातो परंतु तो पेला मात्र अपूर्वा चे बाबा समजून आत्याच्या मिस्टरांच्या हातात देतो. आत्याचे मिस्टर फोनवर चौकशी करतात त्या वेळी अपूर्वा च्या आईने तो पेला पाठवलाच नाही असं समजतं.

तिकडे अजून गोंधळ होतो.'तुझा पम्या ( प्रमोद) असे अपूर्वा च्या बाबांनी तिच्या आईला लिहिलेले ग्रीटिंग कार्ड चुकीच्या बिल्डिंग मध्ये पोहोचते..

भलत्याच घरात भलत्याच बाईला बोक्याचा मित्र देऊन येतो..

प्रचंड नालस्ती होऊन शेवटी ते कार्ड अपूर्वाच्या आईकडे पोहोचते. आणि सर्वांना प्रचंड मनस्ताप होतो..

अजून एक प्रयत्न म्हणून प्रदर्शनामध्ये तिच्या आई-वडिलांना बोलावण्याचा प्रयत्न होतो येतात परंतु घटस्फोटाचा निर्णय काही बदलत नाही...

बोक्या प्रचंड निराश होतो...

बाबासुद्धा त्याचा हिरमुसलेला चेहरा

चेहरा बघून खोदून खोदून विचारतात. त्यावेळी 'झाडे लावा झाडे जगवा' बरोबर

बोक्याचा 'संसार वाचवा' प्रोजेक्ट सुरु होता हे त्यांना कळतं..

त्याला शांतपणे बाबा समजावून सांगतात की त्याचे हे प्रयत्न तात्पुरती मलमपट्टी करणे होते. संसारात नवरा बायकोची भांडणे, अडचणी आणि गेलेले तडे कधी भरून येत नाहीत. तुझा हेतू खूप चांगला होता परंतु उपाय पोरकट होते हे बाबांचे बोलणे बोक्या खाली मान घालून उभा राहतो...

बोक्याच्या प्रकल्पाला तीन हजार रुपयांचे बक्षीस मिळते परंतु बोक्या पैसे नाकारतो..

दोन दिवसांनी पोस्टाने एक चिठ्ठी येते त्या मध्ये लिहिलेलं असतं की

***"तुझ्या सारखा भाऊ मला मिळायला हवा होता बोक्या!".***

अपूर्वा...

काळीज चिरतं...

शेवटी प्रभावळकरांच्या लेखणीचे यश!

पुस्तक : कुछ इश्क किया कुछ काम किया

लेखक : पीयूष मिश्रा


प्रकार : कविता संग्रह

प्रकाशक : राजकमल प्रकाशन

[Amazon]

# कुछ इश्क़ किया कुछ काम किया

**- मानसी सगदेव- मोहरील**




वह लोग बहुत खुशकिस्मत थे
जो इश्क़ को काम समझते थे
या काम से आशिकी करते थे
हम जीते जी मसरूफ रहे
कुछ इश्क़ किया कुछ काम किया

काम इश्क़ के आड़े आता रहा
और इश्क़ से काम उलझता रहा
फिर आखिर तंग आकर हमने
दोनों को अधूरा छोड़ दिया

*फ़ैज़ साहेबांची ही नज़म! वाचल्यावर एका क्षणी हवेत असलेला माणूस धाडकन खाली पडावा, शुद्धीत यावा आणि हातपाय झटकून, स्वतःलाच दोन शिव्या हासडून पुढे चालत जावा.*

ये नहीं तो कुछ और सही
कुछ नहीं तो कुछ ना सही!

*ही नज़म वाचल्यावर पीयूष मिश्रांच्या अंगातही असंच काहितरी संचारलं आणि त्यांनी तब्बल ४२ कडव्यांची एक कविताच लिहून काढली -*

वो काम भला क्या काम हुआ
जिस काम का बोझा सर पे हो
वो इश्क़ भला क्या इश्क़ हुआ
जिस इश्क़ का चर्चा घर पे हो

*बालपण, यौवन, प्रेम, मैत्री, समाजकारण, राजकारण हा काय न तो काय सगळ्याच विषयांवर भाष्य करणारी ही कविता आणि असाच आयुष्याच्या प्रत्येक पानावरून फिरून आलेला हा कवितासंग्रह! कुछ इश्क किया कुछ काम किया!*

*ग्वाल्हेरहून आलेला एक अवलिया, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा मधे गेला, रंगमंचावर आपलं अधिराज्य गाजवलं, सिनेमे लिहिले, सिनेमांची गाणी लिहिलीत आणि हे सगळं करतांना हा अवलिया कलेच्या दुनियेत हरवून गेला. मेथड ॲक्टींग करणारा पीयूष मिश्रा, गाणी लिहिणारा पीयूष मिश्रा, सिनेमा लिहिणारा पीयूष मिश्रा जेंव्हा हातात संवादिनी घेऊन समोर बसलेला असतो तेव्हा तो वेगळाच वाटतो. आपल्याच तंद्रीत, आपल्या कविता आणि गज़ला गात असतो. काही किस्से, काही गाणी, काही आठवणी आणि बल्लिमारन बँड! ही अशी भेट झाली माझी आणि पीयूष मिश्राची! पण नंतर तो मला भेटत राहिला त्याच्या कवितांमधून जेव्हा त्याने भेट दिलेला हा कवितासंग्रह वाचायला घेतला. त्यात काय नाहिये,*

*आपल्या तारुण्यातल्या आठवणी, दिल्लीत 'स्ट्रगल' करतांनाचे दिवस, पहिलं प्रेम, दारूचं व्यसन, परिवार, मुलाकरता लिहालेली कविता, राजकारण, समाजकारण ह्या सगळ्या विषयांवर लिहिलेल्या ह्या कविता आहेत.*

*त्यांच्या छोटा ख्वाब क्यों देखे ह्या कवितेतल्या काही ओळी..*

जो काम मंसूबे समेटे
हो रहा वो काम है
जो इत्तेफ़ाकनहो गया तो
बात ही क्या खास है

है ना कसक ना चाँद को
छूने की कोई हसरतें
बस आ गई तो सो रहो
ये रात भी क्या खास है

*स्वप्न बघायची, मोठी स्वप्न बघायचीत आणि जागेपणीच बघायचीत, कशी पूर्ण होणार नाहीत बघुया.*

क्या करोगे ख़्वाब मेरी
रात में आकर के तुम
मैं तो कभी का जग गया
तुमको लगा मैं सो रहा
मैं तो कभी का मिल गया
तुमको लगा मैं खो रहा ...


*माणसाची इच्छा असली तर हवं ते मिळवता येतं, फिर किस्मत क्या चीज हैं!*

*आपल्या इच्छा शक्तीवर विश्वास ठेवणारा हा अवलिया अगदी मुक्त झालाय सगळ्या बंधनातून. त्याला आता दिसतात व्यथा समाजाच्या, दिसतात रडणाऱ्या; कळवळणाऱ्या मुली - बायका, रस्त्यावर रडणारं नंग, उपाशी पोर, टेबल खालून पैसा खाणारा लखपती कर्मचारी आणि रात्री रस्त्यावर हातगाडीवर झोपणारा प्रामाणिकपणे पैसे कमवणारा मजूर.*

त्याला दिसतात जोर जबरदस्ती करणारे नराधम आणि रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मुली, त्याला दिसते मदमस्त तरुणाई! त्याला दिसतात सुंदर ललना, त्यांच्यातली नजाकत आणि त्याला दिसतं खरंखुरं प्रेम; लैला मजनूचं, माय बापाचं, दोस्तांचं. त्याला दिसते कुर्बानी प्रेमातली आणि देशप्रेमातली. त्याला दिसतात भगतसिंग राजगुरु आणि सुखदेव फासावर चढण्यापूर्वीचे. त्याला दिसतात निरागस बोलके डोळे. त्याला दिसतो तो स्वतः पूर्वीचा, आत्ताचा आणि भविष्यातलाही. आणि हे सगळं सगळं तो लिहितो, कसलंही बंधन न बाळगता, सगळं खरं खरं लिहितो. आणि म्हणूनच त्याच्या वागण्यात, बोलण्यात आणि लिखाणात सारखेपण दिसतो.  हा, वाचायला मिळतात काही शब्द ज्याला आपण **** किंवा बीप बीप बीप करून ऐकतो, पण म्हणूनच तो आहे तसा दिसतो.

आणि हेच वेगळेपण आहे त्याच्या प्रत्येक रचनेत, प्रत्येक काव्यात, प्रत्येक लिखाणात. भेटायचं असेल ना त्याला तर नक्की, एकदातरी नक्कीच वाचा.. तुम्हीही म्हणाल, कुछ इश्क़ किया कुछ काम किया!

- manasi.mohril@gmail.com



पुस्तक : घास घेई पांडुरंग

लेखक : रवीन्द्र भट

प्रकार : कादंबरी


प्रकाशक : इंद्रायणी साहित्य प्रकाशन

Amazon

Bookganga

# घास घेई पांडुरंगा

**- संध्या दुर्गे**




**घास घेई पांडुरंगा, श्रीधरा अनंता |**

**वेळ भोजनाची झाली, त्वरा करी आता ||**

*असं म्हणून पांडुरंगाला जेवायला येण्यासाठी आर्जव करणारा (संत नामदेव), बालक नामदेव, इतके आर्जव करतो, की पांडुरंगाला प्रत्यक्ष प्रकट होऊन, नामदेवा सोबत, समक्ष जेवण करावेच लागते. अशी कथा पूर्वी आम्हाला ”सुलभ भाषां रचना“ या मराठी विषयाच्या पुस्तकात चौथ्या वर्गात होती. ते पुस्तक त्यातील सर्व विविध संतांच्या कथा आमच्या*

बालमनाला खूप भावत आणि मग त्या कथांची पारायणं होत. यामुळे अजूनही त्या  कथा स्मरणात आहेत.

पण त्या संतांचे संपूर्ण चरित्र वाचण्याची इच्छा बरेच दिवसांत पूर्ण होत नव्हती अचानक, "घास घेई पांडुरंगा" हे श्री रविन्द्र भट यांचे पुस्तक फेसबुक वर बघण्यात आले  आणि ते पुस्तक मी नक्कीच "विकत घेऊन वाचेन" हे ठरविले, आणि स्वप्नवत मग पुस्तक  भिसीतून या पुस्तकाची खरेदीही झाली आणि वाचनही झाले.

या पुस्तकाने मला संत नामदेव यांची चौफेर ओळख करून दिली. ज्याव्दारे मला  संत नामदेव हे, "ज्ञानदेवाने दिलेला माणूस धर्माचा" विचार प्रत्यक्ष कृतीत आणून तो बहुजन समाजामध्ये रुजविण्याचे अलौकिक कार्य करणारा नामदेव हा आद्य प्रचारक आहे, हे कळले. तो दासी जनीला संतपदी नेणारा स्त्री मुक्तीचा आद्य उद्गाता आहे, ज्ञानदेवादी भावंडांची वा इतर संतांची चरित्र अभंगरूपाने लिहीणारा आद्य चरित्रकार आहे, चोखोबांची  समाधी बांधणारा नामदेव एक प्रकारे पहिला अस्पृश्योद्धारक आहे. नामदेव हे आद्य समाजकारणी आहेत, अन ते उत्तरेकडील भाषांमधून अभंग रचना करणारे एकात्मतेचे आद्य  उद्गाते आहेत, असे संत नामदेवांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू कळून आले.

या पुस्तकातील अनेक प्रसंग असे आहेत ज्यात आपण अगदी सहज रमून, हरवून  जातो, प्रत्येक प्रसंगात जणू स्वतः तिथे असल्याचा अनुभव घेतो. ही या पुस्तकाची  लेखकाची, शब्दांची ताकद आहे. आपोआपच आपल्याला जणू आपल्यातल्या दुर्गुणांची,  चुकांची, जाणीव होते आणि मन पांडुरंग भक्तीकडे कलू लागते. आयुश्यात "पांडुरंगा" शिवाय सत्य असे काहीच नाही हे उमजून येते.

पुस्तकातील एक प्रसंग मुद्दाम इथे मांडावासा वाटतो मध्यरात्री झालेली असूनही जनाबाई दळण दळते आहे हे लक्षात येताच नामदेवांनी त्यांचे अभंग

लिखाण थांबविले आणि आपल्याच संसारासाठी ही जनाबाई चंदनाप्रमाणे झिजते आहे म्हणून त्यांच्या मनात अपार माया दाटून आली. आणि ते दळण दळणा-या जनाबाई कडे गेले. त्यांनी तिला थांबविले परंतु तिने आपले काम सुरूच ठेवले. शेवटी नामदेव स्वतः तिला दळण दळू लागले. आणि जात्याच्या फेरा बरोबर मुखा वाटे दोघांकडून ही एक एक ओवी येऊ लागली. जात्यातून शुध्द सात्विक पीठ जात्या भोवती गोलाकारात पडू लागले

जात्याचा घरघराट आणि ओव्यांची चाहूल लागल्याने राजाईला जाग आली. तीला मध्यरात्री नामदेव कुठे गेले म्हणून आधी आश्चर्य वाटले. मग मात्र आश्चर्याची जागा संशयाने घेतली. आपला पती अपरात्री दासीच्या पडवीत गेला हे पाहून तिचा मत्सरही जागृत झाला. परिणामी ती नामदेवांचा माग काढत दळण करणा-या नामदेव, जनाबाई पर्यंत पोहोचली, आणि पाहते तर काय ?

आतले दृष्य पाहून ती अंतर्बाहिय ती थरारली. तिचा श्वास वाढला, धडधड वाढली, पाय थरथरू लागले .........

"पडवीत प्रत्यक्ष पांडुरंग जनी सवे जात्यावर दळीत होता." राजाईला या प्रसंगातून शुध्दीवर यायला बराच वेळ लागला. जनाबाई ने राजाईला हळूवार साद घालून उठविले आणि ती तिला विचारू लागली.

राजाईचे ओठ पुन्हा थरथरले ती जनाबाईला म्हणाली, आजवरचं सारं स्वप्न होतं आज पूर्ण सत्याची जाणीव झाली. जने, तू भाग्यवान तुझं दळण दळायला प्रत्यक्ष श्रीहरी आले. तुझ्या सा-या दासीपणाला राज्ञीपद लाभलं. मी नष्ट चांडाळीण प्रत्यक्ष श्रीहरीला सारखी नको नको ती दूषणं देत होते. त्याच्या नावानं बोट मोडीत होते, माझ्या संसाराची सारी वाताहत केली म्हणून बोल लावीत होते."

जनाई म्हणाली, "राजाई, अगं ते तू बोलत नव्हतीस ती तुझ्यातील संसारी गृहीणी बोलत होती, वरची राजाई

मातीच्या देहाच्या हवं नको मध्ये अडकलेली असली तरी आतली राजाई सदैव चिरंतनाच्या ध्यासात आहे. तुझी ही दोन्ही रूपं मी ओळखली आहेत. (पुस्तकातील वाक्ये) असे अनेक उत्तमोत्तम उतारे, आपल्याला आपली ओळख करता येईल अशा पध्दतीने या पुस्तकात आले आहेत.

सुंदर गोष्टीरूप, कादंबरी रूपाने आलेल्या पुस्तकात नामदेव, जर्नाइ व इतरही संतांचे अभंग, हरीपाठ यांनी युक्त आहे.

संत चोखामेळा यांनी भोगलेले कष्ट, त्यांना मिळालेली वागणूक या विशयी वाचून तर डोळयात पाणी येते. अषा अनेक संतांच्या कथाही या पुस्तकात वाचावयास मिळतात उदा. नरहरी सोनार, जो शैव होता जो पंढरपुरात राहूनही विठ्ठल मंदीराकडे कधी फिरकला नाही. त्याच्या मनातील शैव वैष्णवांचे द्वंद्व कसे मिटले, हे कथानक रंजक वाटते.

हे पुस्तक आपल्या मनात हरीभक्ती, माणूसकी, धर्म निश्चितच जागृत करते हे अगदी खरे ! असे हे पुस्तक प्रत्येकाने एकदा तरी वाचावे असे आहे. आणि एकदा वाचले तर पुनःपुन्हा वाचावे असेच आहे.

- sandhyadurge1968@gmail.com

पुस्तक : दिपज्योतीर्नमोस्तुते

लेखक : सुशीला महाजन


प्रकार : चरित्र

प्रकाशक : शिल्पा प्रकाशन

Bookganga

# दिपज्योतिर्नमोस्तुते: एक वंदनीय प्रवास

- डॉ. सोनाली गायकवाड




*राष्ट्र सेविका समितीची सेविका म्हणून काही उपक्रमात भाग घेतल्या जातो, तेव्हा एका उपक्रमात बक्षीस म्हणून पुस्तकं मिळाली. त्यात राष्ट्र सेविका समितीच्या (समिती ) संस्थापक वंदनीय मावशी केळकर ह्यांचं चरित्र असणारं, "दिपज्योतीर्नमोस्तुते ", हे पुस्तक होते. ज्या समितीत आपण जातोय त्याची स्थापना करणाऱ्या आणि ते ही सुमारे नव्वद एक वर्षापूर्वी, अशा अभूतपूर्व व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून घेणं आवश्यक वाटलं, म्हणून पुस्तक*

वाचायला घेतलं.

मुंबईच्या सुशीला महाजन ह्या वंदनीय मावशींच्याच समकालीन असणाऱ्या सेविकेनी हे पुस्तक लिहिलंय. समकालीन आणि समविचारी लेखिकेच्या उत्तम मांडणी आणि लेखनाचा अनुभव पानापानावर अनुभवायला मिळतो. अत्यंत साध्या सोप्या भाषेत वास्तव दर्शन घडविणारे हे पुस्तक म्हणजे साक्षात मावशींच्या आयुष्याचं चलचित्र भासावं इतकं ते नेटकेपणानी मांडलंय. मी एक अत्यंत सामान्य वाचक आणि त्याहून सामान्य सेविका, पण पुस्तक वाचतांना वाचक म्हणून जे समाधान मिळतं त्याही पेक्षा या समाज यज्ञाचा आपण एक बिंदूमात्र का होईना भाग होतोय ह्याचा अभिमान आपल्याला वाटल्या शिवाय राहात नाही. एक जाज्वल्य  प्रेरणादायी व्यक्तिमत्व आपल्याला ह्या पुस्तकातून फार जवळून अनुभवता येतं.

आज आपण स्त्रिया आपल्याच उदरनिर्वाहासाठी घरातून बाहेर पडायचं तर केवढं दिव्य आपण करतोय असं आपल्याला वाटतं. आज आपली जीवन शैली बरीच बदललीय. आपल्या दिमतीला वेगवेगळी यंत्र तंत्र आणि सहाय्यक असतात. पण समितीची स्थापना 1936 मध्ये झाली, त्या आधी वर्ष-दोन वर्ष ही संकल्पना मावशींच्या डोक्यात आली असावी. त्या काळी सामाजिक स्थिती फार वेगळी होती. देश पारतंत्र्यात होता. स्त्रीने घराबाहेर पडणं तितकंस स्वाभाविक नव्हतं. मुलींना शालेय शिक्षण देणं जेमतेम सुरु झालं होतं. परकीय सत्तेमुळे असुरक्षितता होती. अशा सगळ्या सामाजिक स्थितीत व्यक्तीक परिस्थिती जरी चांगली असती तरी एक वेळ ठीक होतं, पण इथे तर सारंच अतर्क्य. लहानगी कमल वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी लग्न होऊन गेली तीच मुळी बीजवराच्या घरात. आधीच्या लग्नाच्या दोन मुली आणि नंतर मावशींना सहा मुले ओळीने झालीत.

संसाराचा हा सगळा पसारा सांभाळत असतांना वैयक्तिक दुःखे आणि जबाबदाऱ्याही पाठ सोडत नव्हत्या. त्यात स्वातंत्र्याचा लढा आणि देशातील हिंदू मुस्लिम जनतेत पडत जाणारी दरी वाढतच जात होती. ह्या सगळ्या सामाजिक परिस्थिती आपल्याला कोणीच वाली नाही का? ही भावना मावशींच्या मनाला स्वस्थ बसू देत नव्हती. अशात यजमानांचे देहावसान आणि पाठोपाठ मोठ्या मुलीचा अल्पवयात मृत्यू, घरात जेमतेम आर्थिक परिस्थिती, ह्या सगळ्यातून ही तेजस्वी बाई नुसती सावरलीच नाही तर फिनिक्स पक्षासारखी सगळी मरगळ झटकून पुन्हा उभी राहिली.

मावशी त्यावेळी महात्मा गांधीच्या कार्यक्रमात भाग घेत. तेव्हा त्यांना जाणवलं, की स्त्रीकडे बघण्याची पुरुषांची दृष्टी चांगली नाही. विशेष म्हणजे स्त्रीलासुद्धा तिच्या सामर्थ्याची जाण नाही. महात्मा गांधी त्यांच्या सायंप्रार्थनेनंतर एखादा विषय घेऊन त्यावर चर्चा करत तेव्हा एका सत्रात महात्मा गांधींनी स्त्रीला सीतेचा आदर्श ठेवावा असे सांगितले, कारण घरातील स्त्री जर सीता झाली तर पुरुष आपोआपच राम होतील असे त्यांचे म्हणणे होते. म्हणजे समाज सुधारणेसाठी समाजातील स्त्रीशक्ती बळकट करणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन वंदनीय मावशींनी स्त्रियांना संघटीत करायचे ठरविले. मनातल्या विचारांना आकार देणे तितकेसे सोपे नव्हते. चार स्त्रिया एकत्र आणायच्या, त्या एका विचारधारेशी जोडायच्या आणि तशा त्या टिकवून ठेवायच्या हे एक अग्निदिव्य होते. मावशीनीं हे काम हाती घेतले आणि प. पू. हेडगेवारांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्र सेविका समितीची पहिली शाखा वर्धेत सुरु केली. मार्गदर्शन केले तरी संघ आणि समिती ह्या एकाच विचारधारेवर काम करणाऱ्या दोन वेगवेगळ्या संस्था असतील हे हेडगेवारांनी पहिलेच स्पष्ट केले होते. त्याप्रमाणे दोन्ही संस्था

आपापले काम अथक नेटाने करत आहेत. समिती मध्ये बौद्धिक गुणांसोबत शारीरिक बळ वाढावे म्हणून प्रशिक्षण देण्यात येतं. वर्धे पाठोपाठ भंडारा, नागपूर आणि बघता बघता संपूर्ण महाराष्ट्रात समितीच्या अनेक शाखा सुरु झाल्या. समितीचे हे मावशींनी लावलेले बीज नुसतेच अंकुरीत होऊन रोपटे झाले नाही, तर समिती कार्याचा वटवृक्ष होऊ लागला. महाराष्ट्राबाहेरही समितीच्या शाखा सुरु झाल्या. स्त्रीला स्वत्वाची जाणीव होऊन ती जागरूक होऊ लागली. मावशींचं कुटुंब आता सहा मुलं, दोन मुली, जाऊबाई इतकंच सीमित नव्हतं, तर वेगेवेगळ्या शहरांत तयार होणाऱ्या सेविकाही त्यांच्या कुटुंबाचाच भाग होत होत्या.त्यांच्या समिती कार्याची पताका वाढतच होती. प. पू. हेडगेवारजी त्या वेळच्या अनेक तत्सम स्त्री संघटना समिती कार्यात स्वतःला एकरूप होण्याचा सल्ला देत. त्या संघटना आनंदाने स्वत्व विसरून समितीच्या झाल्या. हे सगळे होतं असतांना देशात स्वतंत्र्याची चळवळ जोर घेत होती. पण सोबतच हिंदु मुस्लिम दंगे आणि त्यांच्यातील भेद विकोपाला जात होते. अशात कराची येथे जी शाखा सुरु केली होती, तेथील सेविकांना फार असुरक्षित वाटू लागले. त्यांना धीर देणे फार गरजेचे होते. त्यासाठी मावशी तेवढ्या दंगालींच्या दिवसात वेणूताईंना घेऊन दोघीच विमानाचा प्रवास करून कराचीला गेल्या. तेथील सेविकांना नुसतेच शाब्दिक आधार देऊन त्या थांबल्या नाहीत तर प्रसंग आला तेव्हा तेथून आलेल्या तरुणींना त्यांनी वेगेवेगळ्या घरात आश्रय देऊन त्यांच्या सुरक्षिततेची काळजी देखील घेतली.

स्वातंत्र्यानंतर खरंतर स्वतंत्र भारतात ही संघटना आणखी फोफावायला हवी होती पण तसे न होता गांधी वधानंतर संघावर जेव्हा बंदी घालण्यात आली तेव्हा परिस्थितीनुरूप मावशींनी स्वतहून समिती शाखा बंद केल्या. शाखा भरणे

बंद झाले तरी कार्य सुरूच होते. फक्त स्वरूप बदलेले होते. समितीच्याच सेविका भजनमंडळ, कीर्तन ह्या माध्यमातून स्त्रियांच्या नुसत्या संपर्कात नव्हत्या तर त्यांना जागरूक देखील ठेवण्याचे काम करीत होत्या. नंतर कालांतराने समिती शाखा पुन्हा सुरु झाल्या पण तरी भजन मंडळ, कीर्तने सुरूच होती. खाणीतून हिरे शोधण्याची कला मावशींना अवगत होती. संपर्कात आलेल्या प्रत्येक स्त्रीत काय विशिष्ट कला गुण आहे हे त्या नेमक्या हेरत व तद्रूप काम त्या सेविकांवर मावशी सोपवत. मावशींनी तयार केलेल्या सेविकाही त्यांच्या विश्वासास संपूर्ण समर्पित भावनेने खऱ्या उतरत.

मावशींनी अनेक कामे केली त्यात त्यांनी नाशिक येथे राणी लक्ष्मीबाई स्मारक उभारले तसेच  वर्धा येथे झाशीच्या राणीच्या शंभराव्या पुण्यतिथी बद्दल झाशीच्या राणीचा पुतळा उभा केला. अकोणवीसशे पासष्ट साली पाकिस्तानशी युद्ध झाले तेव्हा सैनिकांचे मनोधैर्य वाढविले. त्यांना भेटी, खाद्यपदार्थ पुरविले.

इतकंच नाही तर आणीबाणीच्या वेळी परिस्थिती आवाक्यात येऊन सगळं पुन्हा सुरळीत यावं म्हणूनही मावशींनी प्रयत्न केले.

समिती कार्यासाठी कार्यालय असणे आवश्यक असल्याने नागपूरच्या मध्यवर्ती भागात, धंतोलीत  जागा घेण्यात आली. त्या वास्तूला 'देवी अहल्यामंदिर', असे नाव देण्यात आले. याच धर्तीवर मुंबई येथे राजमाता जिजाबाई ट्रस्ट असे नाव ठेवण्यात आले. त्यापाठोपाठ वेगवेगळ्या ठिकाणी समितीकार्यासाठी जागा घेण्यात आल्या. त्याच बरोबर मावशींनी रामायणावर प्रवचणे केलीत. त्यातून घराघरात राम पोहचावा आणि देशात रामराज्य यावे असा विचार असावा. ह्या सगळ्या कामात त्यांना साथ मिळाली ती उमाकाकुंची. त्यांनी मावशींच्या जावेतून बहिणीची भूमिका आजन्म पार पाडली. वेगवेगळ्या ठिकाणी उभारल्या

जाणाऱ्या समिती कार्यलया सोबत नागपुला शक्तिपीठाची उभारणी झाली. त्यात उद्योगमंदिर, मदतकेंद्र, वसतिगृह सुरु झाले.

पुढे जाऊन समिती कार्याची चतुःसूत्री तयार झाली ती अशी, समाजातील अज्ञान दूर करणे, गुणवत्ता वाढविणे, श्रद्धास्थान बळकट करणे, धर्मकल्पना स्पष्ट करणे. एवढेच नव्हे तर समिती आणि सेविकांनी आणीबाणी सारख्या कठीण काळात सत्याग्रह करून परिस्थितीशी दोन हात केले. अशा ह्या झंझावाती तेजस्वी विदुषीची प्राणज्योत दोन महिन्याच्या आजारानंतर दिनांक २७ नोव्हेंबर १९७८ मध्ये मालवली.

ज्योत मावळली तरी ज्योतीचा प्रकाश आजही समिती कार्याच्या रुपाने आसमंत उजळून काढत आहे. म्हणून त्या ज्योतीला माझा नमस्कार. मरावे परी कीर्ती रूपे उरावे ही उक्ती मावशींनी खरी केली.

अशा ह्या अभूतपूर्व व्यक्तिमत्वाची ओळख सुशीलाताईंनी ह्या "दीपज्योतीर्नमोस्तुते", पुस्तकाच्या माध्यमातून आम्हा वाचकांना करून दिली म्हणून त्यांच्या ऋणात आम्ही वाचक सदैव राहू.

- sonaliumesh05@gmail.com

पुस्तक : पणतीला जपताना


लेखक : समीर दरेकर

प्रकार : माहितीपर

प्रकाशक : अभिनव निर्माण प्रकाशन

# पण'ती'ला जपताना

- स्नेहा जोशी




*एखाद्या व्यक्तिला कॅंसर सारखा दुर्धर आजार होतो आणि जोपर्यंत निदान होतंय तोवर त्याने शरीरभर आपलं अस्तित्व पसरवलेलं असतं अशा परिस्थितीत चांगल्यातले चांगले डॉक्टर रुग्णाला वाचवण्यासाठी करता येतील तितके कठीण पण गरजेचे उपचार करतात. उपचारांवेळी रुग्ण भयानक त्रासातुन जात असतो, मानसिक, शारिरीक, भावनिक सगळ्या पातळ्यांवर युद्धजन्य परिस्थिती असते पण एकदा कॅंसरच्या पेशी उपचाराने नष्ट झाल्या,*

की भविष्यात आपल्या शरीराची योग्य ती काळजी, पथ्यपाणी सांभाळून रुग्ण पूर्णपणे आनंदी जीवन जगू शकतो.

ह्याचाचं संदर्भ एका सामाजिक गोष्टीला तंतोतंत लागु पडतोय आणि ती सामाजिक गोष्ट आहे लव्ह जिहाद. आता बऱ्याच लोकांच्या कपाळावर आठ्या आल्या असतील हा विषय वाचुन पण जी गोष्ट कॅंसरच्या रुग्णाची सांगितली तीचं गोष्ट आज समाजात वावरणाऱ्या प्रत्येकालाचं लागु आहे. लव्ह जिहादसारखा प्रकार माझ्या किंवा आमच्या बाबतीत घडूच शकत नाही, असा विचार बाळगणाऱ्या कित्येक कुटुंबात याने वाताहात केलीये. आणि म्हणूनच Prevention Is Better Than Cure या उक्तीनुसार रोग शेवटच्या टप्प्यात पोहोचण्याआधीचं तो शरीरातून नष्ट कसा करायचा, याची सोपी, साधी माहिती देणाऱ्या पुस्तकाबद्दल मी सांगते आहे.

हे पुस्तक आहे, "पणतीला जपताना". लव्ह जिहाद संदर्भात पडणाऱ्या प्रश्नांवर अगदी स्पष्ट, रोखठोक आणि पटतील अशी संदर्भासहित दाखले यात लेखकांनी समाविष्ट केलेले आहेत. आपण विचार करतो त्याहीपेक्षा हा लव्ह जिहाद कधी पासुन अगदी शांतपणे आपले हातपाय पसरतोय, हे आपल्या लक्षात येईल आणि फक्त प्रेमप्रकरणंच नाही तर जमीन, व्यापार, तुमची मालमत्ता या सगळ्यांवर अगदी शांतपणे डोळा ठेऊन, संधी मिळताच काबीज करण्याचा प्रयत्न व्यवस्थित, पद्धतशीरपणे चालु आहे जो आपल्या सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या लोकांच्या डोक्यातही येणार नाही.

सर्वांगांनी परिपूर्ण अशा या पुस्तकात, देव,देश, धर्मासाठी काम करणाऱ्या सर्वचं कार्यकर्त्यांना कायदेशीर बाबींची माहिती व्हावी यासाठी खूप महत्त्वपूर्ण मार्गदर्शन तर केलं आहेचं पण त्यासोबतचं इस्लाम धर्म ज्या कुराण शरीफला मानतो, त्या कुराणामध्ये इतर धर्म किंवा इतर

धर्माला मानणाऱ्या लोकांविषयीचे विचार, त्यांना नाकारणारे श्लोक ज्याला आयत म्हणतात ते सविस्तरपणे दिलेले आहेत. फक्त पणतीला जपताना हे पुस्तकाचे नावं असले तरी केवळ मुलीला किंवा तिच्या पालकांनाचं दोषी ठरवुन त्यांना उपदेश देणारी कुठलीचं अशी गोष्ट यामध्ये सामील नाही.

सोशल मिडीया येण्याआधीपासून या गोष्टी होत होत्या, तेव्हा त्याचं प्रमाणही नगण्य होतं हे आपण लक्षात घ्यायला हवं. आताच्या फेसबुक, इन्स्टाच्या जमान्यात हे प्रकार दसपटीने घडतायेत आणि सोपे झाले आहेत, यावरही आपलं लक्ष हवंच. धर्मांतर, पुनर्विवाह, विसंगत कुटुंबपद्धती, समाजाप्रती अनास्था, वाढते घटस्फोट, किशोरवयीन मुलांचं बदलतं भावविश्व, जीवनपद्धती या सगळ्याचं गोष्टी या लोकांच्या पथ्यावर पडणाऱ्या आहेत हे आपण ध्यानात घ्यायला हवं.

एकंदर अत्यवस्थ रुग्णाला उपचार म्हणुन संजीवनी मिळावी आणि रुग्णाला जीवदान मिळावं, असं काहीसं या पुस्तकाबद्दल म्हणता येईल लेखक समीर दरेकरांना यानिमित्ताने खूप धन्यवाद, आपल्यामुळे हे पुस्तक वाचणाऱ्या लोकांचे डोळे उघडायला, जागरुकता यायला खुप मदत होईल. लेकीबाळींची, समाजाची आणि पर्यायाने देश व धर्माची काळजी असणाऱ्या प्रत्येकाने हे पुस्तक नक्की वाचावं. मुली, महिलांना अगदी भेटस्वरुपात देण्यासाठी सुद्धा या पुस्तकाइतकं महत्वपूर्ण असं काहीच नाही.

सामाजिक, राजकीय, पत्रकारिता, प्रशासकीय यंत्रणा या सर्वच क्षेत्रातील लोकांना त्यांच्या भूमिकेबद्दल विवेकी विचार करायला लावणारं हे पुस्तक आहे. अखेरीस काय तर आपलं कुटुंब सुरक्षित राहण्यासाठी आपण प्रत्येकाने प्रयत्न केले तर समाज आणि देश आपोआप या धर्मसंकटातून बाहेर पडतील, हे तितकंच खरं.

- joshisneha.1919@gmail.com

# नवे वर्ष
# नवे पुस्तक
# नवे विचार

भेटूया लवकरच...